ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 17 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## घटनादुरुस्ती विधेयकावर घाई नको! खरगेंचे पंतप्रधान मोदींना पत्र





पान 3 वरुन...

YCM मधील डॉक्टर निलंबित







## ‘लहरा दो तिरंगा’ आंदोलनाने राजधानीत खळबळ; आंदोलक रस्त्यावर

# दीपके अन् बोरांना अटक

महाईन्यूज । नवी दिल्ली

**राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचे आवाहन, निवडणूक आयोगाच्या प्रमुखांच्या राजीनाम्याची मागणी आणि आंदोलकांविरोधातील पोलिसी कारवाई यांमुळे शुक्रवारी (१६ ऑक्टोबर) राजधानी दिल्लीतील राजकीय वातावरण तापले. कॉकरोच जनता पार्टीच्या (CJP) ‘लहरा दो तिरंगा’ आंदोलनाला रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी कडक निर्बंध लागू केले असतानाही कनॉट प्लेस परिसरात शेकडो नागरिकांनी तिरंगे फडकवत आंदोलनात सहभाग घेतला. आंदोलनाचे संस्थापक अभिजीत दीपके यांना नियोजित कार्यक्रमासाठी घराबाहेर पडत असताना पोलिसांनी ताब्यात घेतले. अखिल भारतीय विद्यार्थी संघटनेच्या (AISA) नेत्या नेहा बोरा यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. या घडामोडींमुळे तिरंगा आंदोलनाला राजकीय वळण मिळाले असून, लोकशाही अधिकार आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचा मुद्दा चर्चेत आला आहे.**

दरम्यान, निवडणूक आयोगाने पक्षपातीपणाचे आरोप फेटाळले असून, मृत व्यक्ती, स्थलांतरित मतदार, दुबार नोंदी आणि शोधता न आलेल्या मतदारांची नावे वगळण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया राबवली जात असल्याचे स्पष्ट केले आहे.

या आंदोलनाला नवे वळण मिळाले ते CJP चे कार्यकर्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना जंतरमंतर परिसरात आंदोलन करताना झालेल्या कारवाईनंतर. या दोघांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुटकेची मागणी आणि तिरंगा फडकवण्याच्या अधिकाराचा मुद्दा पुढे करत CJP ने ‘लहरा दो तिरंगा’ आंदोलनाची हाक दिली.

### आंदोलनापूर्वीच अभिजीत दीपके ताब्यात

आंदोलनाच्या नियोजित वेळेपूर्वीच दिल्ली पोलिसांचे पथक अभिजीत दीपके यांच्या झंडेवालान येथील निवासस्थानी पोहोचले. त्यांना कनॉट प्लेसमध्ये आंदोलन न करण्याची नोटीस बजावण्यात आली. त्यानंतर दीपके आंदोलनस्थळी जाण्यासाठी घराबाहेर पडले असता पोलिसांनी त्यांना रोखून ताब्यात घेतले.

### नेहा बोरा यांनाही ताब्यात घेतल्याचा दावा

AISA च्या नेत्या नेहा बोरा या आंदोलनात सहभागी होण्यासाठी कनॉट प्लेसकडे जात असताना दिल्ली पोलिसांनी त्यांना आणि इतर काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. AISA च्या एका सदस्याने बोरा यांना अज्ञात ठिकाणी नेण्यात आल्याचा दावा समाजमाध्यमांवर केला. या दाव्याबाबत संबंधित वेळेपर्यंत पोलिसांकडून स्वतंत्र पुष्टी झालेली नव्हती.



### नेमके आंदोलन कशासाठी?

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेतील (SIR) कथित अनियमिततांविरोधात CJP सातत्याने आंदोलन करत आहे. मतदारयाद्यांमधून मोठ्या संख्येने नावे वगळण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या प्रक्रियेमुळे पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू शकतात, अशी आंदोलकांची भूमिका आहे.

# ‘रॅपिडो’ची ‘बाईक टॅक्सी’ बंद!

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे ‘पुणे आरटीए’च्या बैठकीत आदेश

**महाईन्यूज । पुणे**

**‘रॅपिडो’च्या ‘बाईक टॅक्सी’ सेवा रीतसर परवानगी मिळेपर्यंत बंद करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या (आरटीए) बैठकीत दिले. ‘ओला’, ‘उबर’, ‘रॅपिडो’ आदी ॲग्रिगेटर कंपन्यांविषयी आलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी पुणे ‘आरटीए’ची बैठक घेण्यात आली.**






या बैठकीला प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले, पिंपरी-चिंचवडचे उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव, पिंपरी चिंचवडचे वाहतूक पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख या अधिकाऱ्यांसह रिक्षाचालक, कॅबचालक संघटनांचे प्रतिनिधी, ‘ओला’, ‘उबर’ आणि ‘रॅपिडो’चे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डूडी म्हणाले, “रॅपिडो’च्या बाईक टॅक्सी सेवेला अद्याप सरकारकडून परवाना मिळाला नाही. त्यामुळे या सेवा तातडीने बंद ‘ओला’, ‘उबर’, ‘रॅपिडो’ आदी ॲग्रिगेटर कंपन्यांविषयी आलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी पुणे ‘आरटीए’ची बैठक घेण्यात आली. करण्यात याव्यात. तसेच ‘ओला’, ‘उबर’, ‘रॅपिडो’सह रिक्षाचालक कॅबचालकांनी सरकारी मान्यताप्राप्त दरांनुसार भाडे आकारावे.’

‘ओला, उबर, रॅपिडो या कंपन्यांनी चालू महिन्यातील संपूर्ण प्रवास आणि भाडेदरांची माहिती १० नोव्हेंबरपर्यंत ‘आरटीए’समोर सादर करणे गरजेचे आहे. त्यांच्याकडून नियमांचे पालन होत आहे, की नाही याची पडताळणी करण्यात येणार आहे. सरकारी मीटरदरांबाबत सर्व पोलीस ठाण्यांना सूचना देण्यात येतील,’ असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा रिक्षा संघटनांनी दिला.

> सरकारी दरांचे उल्लंघन करून प्रवाशांची आणि चालकांची आर्थिक लूट खपवून घेतली जाणार नाही. कंपन्यांनी सरकारी आदेशांचे पालन न केल्यास पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सर्व रिक्षा-कॅब चालक संघटना एकत्र येऊन तीव्र आंदोलन करतील.
>
> – **डॉ. केशव क्षीरसागर**, अध्यक्ष, महाराष्ट्र कामगार सभा.

> ‘ओला’ आणि ‘उबर’सारख्या भांडवलदार कंपन्या नेहमीच ऑटो-टॅक्सी चालकांची पिळवणूक करीत आहेत. केवळ नफा कमवण्याच्या उद्देशाने या कंपन्या गोरगरीब चालकांचे आर्थिक शोषण करीत आहेत. प्रशासनाने दिलेल्या आदेशांचे आणि नियमांचे या कंपन्यांकडून सातत्याने उल्लंघन होत आहे. त्यामुळे नियमांची पायमल्ली करून मनमानी करणाऱ्या या सर्व कंपन्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत.
>
> – **डॉ. बाबा कांबळे**, अध्यक्ष, महाराष्ट्र रिक्षा पंचायत

> पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात बाईक टॅक्सीला परवानगी देण्यात येऊ नये. ऑटो रिक्षा भाडेदर ठरवण्याची प्रादेशिक परिवहन प्राधिकरण ही सक्षम यंत्रणा आहे. मात्र, ॲग्रिकेटर कंपन्या त्यांच्या ॲपद्वारे वेगळे भाडे आकारतात. हे भाडेदर ठरवणाऱ्या नियामक यंत्रणेच्या अधिकारावर केलेले आक्रमण आहे. त्यामुळे प्रवासी मीटरप्रमाणे रिक्षा भाडेदर द्यायचे, हे विसरून ॲप कंपन्यांच्या नियमबाह्य भाडेदराचा आग्रह धरतात. कंपन्यांच्या स्वयंघोषित भाडेदर ठरण्यावाला चाप लावला पाहिजे.
>
> – **नितीन पवार**, अध्यक्ष, रिक्षा पंचायत

# पुणे महानगरातील एचसीएमटीआर व इनर रिंग रोडच्या भूसंपादनाला गती!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या २४ मीटर रुंदीच्या एचसीएमटीआर आणि ६५ मीटर रुंदीच्या इनर रिंग रोड प्रकल्पांच्या भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकल्पांच्या मार्गातील आवश्यक जमिनींची संयुक्त मोजणी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.**



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित संयुक्त आढावा बैठकीत या प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी, अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त पोलीस आयुक्त (वाहतूक) मनोज पाटील यांच्यासह जिल्हा प्रशासन, पुणे महानगरपालिका, पीएमआरडीए आणि पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही प्रकल्पांच्या मार्गातील जमिनींचे सीमांकन आणि संयुक्त मोजणी विहित मुदतीत पूर्ण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. राज्य शासनाच्या अखत्यारीतील आवश्यक जागांच्या हस्तांतरणासाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेली पूरक कागदपत्रे आणि तांत्रिक अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचनाही महानगरपालिकेला देण्यात आल्या.

पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एचसीएमटीआर आणि इनर रिंग रोड हे प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. या प्रकल्पांमुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त (वाहतूक) मनोज पाटील यांनी सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले.

राज्य शासनाच्या अखत्यारीतील जागांचे हस्तांतरण तसेच खासगी जमिनींच्या भूसंपादनाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पुणे महानगरपालिका आणि पीएमआरडीए यांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, यावर बैठकीत भर देण्यात आला.

### पुणे ग्रँड टूरच्या पार्श्वभूमीवरही आढावा

आगामी ‘पुणे ग्रँड टूर २०२७’च्या पार्श्वभूमीवर शहरातील पायाभूत सुविधा, रस्त्यांचे जाळे आणि वाहतूक व्यवस्थेच्या पूर्वतयारीचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. केंद्र शासनाच्या संरक्षण आणि रेल्वे विभागाच्या अखत्यारीतील जागांसंदर्भातील प्रक्रियेला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# रुग्णसेवेच्या कर्तव्यावर मद्यधुंद? YCM मधील डॉक्टर निलंबित

## डॉ. वैभव म्हस्के यांच्याविरुद्ध महापालिकेची कारवाई; आयुक्तांकडून विभागीय चौकशीला मंजुरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (YCM) रुग्णालयात कर्तव्यावर असताना मद्यधुंद अवस्थेत आढळल्याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव अविनाश म्हस्के यांना निलंबित करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी १६ ऑक्टोबर रोजी याबाबतचे आदेश दिले. संबंधित डॉक्टरांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असून, १५ दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.**




डॉ. म्हस्के हे महापालिकेच्या गट-ब संवर्गातील वैद्यकीय अधिकारी असून, YCM रुग्णालयात कार्यरत आहेत. १५ ऑक्टोबर रोजी ते कर्तव्यावर असताना मद्यधुंद अवस्थेत आढळल्याची बाब रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाचा अहवाल आणि आयुक्तांची मान्यता विचारात घेऊन निलंबनाची कारवाई करण्यात आली.

कर्तव्यावर असताना मद्याच्या प्रभावाखाली राहणे हे सेवा नियमांचे उल्लंघन असल्याचे प्रशासनाने आदेशात नमूद केले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ व २८ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संबंधित तरतुदींच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ नुसार निलंबन, तर नियम ८ नुसार विभागीय चौकशीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालय प्रशासनाला निलंबन आदेशाची अंमलबजावणी करून त्याबाबतची पोहोच सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, निर्धारित १५ दिवसांच्या मुदतीत दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

निलंबन काळात डॉ. म्हस्के यांना नियमानुसार निर्वाह भत्ता मिळणार असला, तरी त्यासाठी विहित अटींचे पालन करावे लागणार आहे. या कालावधीत त्यांना अन्यत्र नोकरी किंवा व्यवसाय करता येणार नाही. तसेच, त्यांचे मुख्यालय पिंपरी येथे निश्चित करण्यात आले असून, वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. विभागीय चौकशीच्या निष्कर्षांनुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

### १५ दिवसांत दोषारोपपत्र दाखल होणार

YCM रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव म्हस्के यांना कर्तव्यावर मद्यधुंद अवस्थेत आढळल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विभागीय चौकशीला मान्यता देत १५ दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. चौकशीच्या निष्कर्षांनुसार पुढील कारवाई केली जाणार आहे.

# मालमत्ता कर थकविणाऱ्यांनो सावधान! महापालिका जप्तीच्या तयारीत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. करवसुलीत दिरंगाई करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिला. थकबाकीदारांना नोटिसा बजावूनही कराचा भरणा न केल्यास नियमानुसार मालमत्ता जप्तीची कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.**




महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी चालू आर्थिक वर्षातील कर वसुलीचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त सांडभोर यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात करसंकलन व कर आकारणी विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत मालमत्ता कराची थकबाकी, मालमत्ता जप्ती, मालमत्ता हस्तांतरणाची प्रकरणे, सारथी पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी आणि मागील बैठकीतील सूचनांवरील कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

महापालिकेच्या अंदाजपत्रकात मालमत्ता कराच्या उत्पन्नाचा मोठा वाटा असतो. या उत्पन्नातून विविध विकासकामे आणि नागरी सुविधांसाठी आर्थिक नियोजन केले जाते. त्यामुळे करवसुलीचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्व सहाय्यक मंडल अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील परिस्थितीचा अभ्यास करून नियोजनबद्ध करवसुली मोहीम राबवावी. तसेच करवसुली वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची लेखी माहिती सादर करावी, अशा सूचना सांडभोर यांनी दिल्या.

### थकबाकीदारांवर कारवाईला प्राधान्य

करवसुली वाढविण्यासाठी ज्या मालमत्तांकडून थकीत कराची वसुली तुलनेने लवकर होऊ शकते, अशा मालमत्तांवर प्राधान्याने लक्ष केंद्रित करावे. थकबाकीदारांना वारंवार सूचना देऊनही कराचा भरणा न करणाऱ्यांना नियमानुसार नोटिसा बजावून जप्तीची कारवाई करावी. करवसुलीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक त्या कठोर उपाययोजना करताना दिरंगाई करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.



मागील पाच वर्षांतील मालमत्ता कर संकलनाची आकडेवारी तपासून चालू वर्षातील वसुलीची तुलना केली जाणार आहे. मागील वर्षांच्या तुलनेत यंदा करवसुलीत अपेक्षित वाढ साध्य करण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करावे. करवसुलीतील प्रगती तपासण्यासाठी यापुढे दर पंधरा दिवसांनी आढावा बैठक घेण्यात येणार आहे.

या बैठकीला करसंकलन व कर आकारणी विभागाचे उपआयुक्त सचिन पवार, प्रशासन अधिकारी रश्मी देशपांडे यांच्यासह सहाय्यक मंडल अधिकारी आणि विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

### नवीन मालमत्तांच्या कर आकारणीला गती

महापालिकेच्या नवीन मालमत्ता सर्वेक्षणांतर्गत कर आकारणीच्या प्रक्रियेत असलेल्या मालमत्तांची कार्यवाही वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. निवासी, बिगरनिवासी, मिश्र वापराच्या, औद्योगिक मालमत्ता आणि मोकळ्या जमिनींची माहिती अद्ययावत ठेवण्यावर भर देण्यात आला. तसेच मालमत्ता करासंबंधीच्या प्रलंबित तक्रारी, मालमत्ता हस्तांतरणाची प्रकरणे आणि अन्य कामांचा वेळेत निपटारा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



## भूमिका

**सौदी अरेबियातील वाढते सुरक्षा संकट आता केवळ आखाती देशांपुरते मर्यादित राहिलेले नाही. तेलसुविधा, विमानतळ आणि व्यापारी मार्गांवरील हल्ल्यांमुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यापुढे गंभीर आव्हान उभे राहिले आहे. इराण, अमेरिका, इस्रायल आणि येमेनमधील हुथी बंडखोर यांच्यातील संघर्षाची व्याप्ती वाढत असताना त्याचे पडसाद भारतावरही उमटण्याची शक्यता आहे.**

# सौदीतील धग भारताच्या चुलीपर्यंत!



त्यामुळे सौदीतील अस्थिरतेकडे केवळ आंतरराष्ट्रीय राजकारणातील आणखी एक संघर्ष म्हणून पाहणे भारताला परवडणारे नाही.

सौदीचे युवराज मोहम्मद बिन सलमान यांनी 'व्हिजन २०३०'च्या माध्यमातून देशाची अर्थव्यवस्था तेलावरील अवलंबित्वातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पर्यटन, क्रीडा, उद्योग आणि परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन सौदीला जागतिक आर्थिक केंद्र बनविण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. मात्र, या महत्त्वाकांक्षी परिवर्तनासाठी आवश्यक असलेली शांतता आणि सुरक्षितताच धोक्यात आली, तर विकासाच्या योजनांवरही प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. अस्थिरतेच्या वातावरणात गुंतवणूकदारांचा विश्वास टिकविणे आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन करणे कठीण होते. त्यामुळे या संघर्षाची किंमत सौदीला केवळ संरक्षण खर्चाच्या स्वरूपात नव्हे, तर आर्थिक विश्वासार्हतेच्या रूपानेही मोजावी लागू शकते. या संकटाचा सर्वाधिक गंभीर परिणाम ऊर्जा क्षेत्रावर होऊ शकतो.

होर्मुझ सामुद्रधुनी हा जागतिक तेल वाहतुकीतील अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या परिसरातील संघर्ष वाढल्यास तेलपुरवठा विस्कळीत होण्याची आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. भारताची ऊर्जेची गरज मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असल्याने तेलाच्या किमतीतील वाढीचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. वाहतूक खर्च वाढतो, उत्पादन महाग होते आणि त्याचा भार अखेरीस सर्वसामान्य ग्राहकांवर पडतो. आधीच महागाईच्या झळा सोसणाऱ्या नागरिकांसाठी हा अतिरिक्त आर्थिक ताण ठरू शकतो.

भारतापुढील दुसरे मोठे आव्हान म्हणजे आखाती देशांमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांची सुरक्षा. सौदी अरेबियात लाखो भारतीय कामगार आणि व्यावसायिक वास्तव्यास आहेत. त्यांच्या रोजगारातून मिळणारे उत्पन्न अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याचा आधार आहे. संघर्षामुळे विमानसेवा खंडित झाल्यास प्रवासी, कामगार आणि धार्मिक यात्रेकरू अडकण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत भारतीय दूतावासाने संपर्कव्यवस्था सक्षम ठेवणे, नागरिकांची नोंद अद्ययावत करणे आणि गरज पडल्यास सुरक्षित स्थलांतराची तयारी ठेवणे आवश्यक आहे. भारताने या संकटात भावनिक प्रतिक्रिया देण्याऐवजी संतुलित आणि सक्रिय मुत्सद्देगिरीचा मार्ग स्वीकारला पाहिजे. सौदीशी असलेले ऊर्जा आणि व्यापार संबंध जपतानाच इतर तेल उत्पादक देशांकडून पुरवठ्याचे पर्याय वाढविणे गरजेचे आहे. त्याचवेळी संघर्षातील सर्व संबंधित पक्षांशी संवाद साधून तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

युद्धाचा विस्तार रोखणे ही केवळ आखाती देशांची जबाबदारी नाही. जागतिक अर्थव्यवस्था आणि लाखो नागरिकांचे जीवन त्याच्याशी जोडलेले आहे. सौदीतील संघर्षाची धग भारताच्या अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचण्याआधीच ऊर्जा सुरक्षा, नागरिकांचे संरक्षण आणि महागाई नियंत्रण या आघाड्यांवर भारताने ठोस पावले उचलली पाहिजेत. कारण परदेशातील युद्धाची झळ अखेरीस सामान्य माणसाच्या घरखर्चाला बसते, हे विसरून चालणार नाही.

## प्रासंगिक »

### स्वाभिमानाची किंमत

**एका गावात एक गरीब शेतकरी राहत होता. त्याच्याकडे थोडीशी जमीन होती. गावातील श्रीमंत सावकाराने त्याला मदतीचे आश्वासन दिले; मात्र त्या बदल्यात शेतकऱ्याने प्रत्येक निर्णय त्याच्या सांगण्याप्रमाणे घ्यावा, अशी अट घातली.**

सुरुवातीला शेतकऱ्याने अट मान्य केली. सावकाराच्या मदतीमुळे त्याची परिस्थिती सुधारली; पण हळूहळू सावकार त्याच्या पिकांपासून ते घरखर्चापर्यंत प्रत्येक गोष्टीत हस्तक्षेप करू लागला. शेतकऱ्याला जाणवले की, मदतीच्या बदल्यात तो स्वतःचे स्वातंत्र्य गमावत आहे.

एके दिवशी दुसऱ्या गावातील व्यापाऱ्याने त्याला योग्य दरात धान्य विकत घेण्याची संधी दिली. सावकाराने विरोध केला; पण शेतकऱ्याने धैर्याने स्वतःचा निर्णय घेतला. त्याने इतर व्यापाऱ्यांशीही संबंध जोडले आणि सावकारावरील अवलंबित्व कमी केले.

काही दिवसांनी सावकारालाही समजले की, शेतकऱ्याला दबावाने नव्हे, तर समानतेनेच सोबत ठेवता येईल.

- तात्पर्य : मदत स्वीकारणे चुकीचे नाही; मात्र मदतीच्या बदल्यात स्वाभिमान गहाण ठेवू नये. खरी मैत्री परस्पर आदरावर टिकते, दबावावर नाही.

आंतरराष्ट्रीय राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, तर कायमस्वरूपी हितसंबंध असतात, हा सिद्धांत भारताने लक्षात ठेवण्याची वेळ आली आहे.

# भागीदारी हवी, अमेरिकेची मर्जी नव्हे!

अमेरिका ही भारताची महत्त्वाची व्यापारी आणि सामरिक भागीदार असली, तरी या मैत्रीच्या नावाखाली भारताच्या आर्थिक हितसंबंधांशी तडजोड करता येणार नाही. दोन्ही देशांतील संबंध केवळ नेत्यांच्या गळाभेटी, संयुक्त निवेदने आणि जाहीर सभांमधील कौतुकावर टिकत नाहीत. त्यांचा पाया परस्पर आदर, समानता आणि एकमेकांच्या सार्वभौम निर्णयांचा सन्मान हा असला पाहिजे.




अमेरिकेच्या व्यापारविषयक धोरणांमुळे भारतीय उद्योग, शेतकरी, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र आणि विद्यार्थ्यांपुढे नवी आव्हाने उभी राहत आहेत. कृषी व दुग्धव्यवसायाची बाजारपेठ खुली करण्यासाठी भारतावर दबाव आणला जात असेल, तर त्यामागील परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे. देशातील मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असताना केवळ व्यापार करारासाठी शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. त्याचप्रमाणे, भारतीय कुशल व्यावसायिकांसाठी व्हिसाविषयक अटी कठोर झाल्यास त्याचा परिणाम रोजगार, तंत्रज्ञान क्षेत्र आणि दोन्ही देशांतील आर्थिक सहकार्यावर होऊ शकतो. भारत-अमेरिका व्यापार संबंधांत असलेली असमानता दूर करण्यासाठी भारताने ठाम भूमिका घेतली पाहिजे. व्यापार करार म्हणजे एका देशाने दुसऱ्याच्या अटी स्वीकारण्याचा व्यवहार नव्हे. दोन्ही देशांना लाभ होईल, अशा तडजोडी त्यात अपेक्षित असतात. अमेरिकेला भारतीय बाजारपेठ हवी असेल, तर भारतीय उद्योगांनाही अमेरिकेत समान संधी मिळाली पाहिजे. भारताच्या कृषी आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रातील संवेदनशीलता लक्षात घेऊनच कोणताही निर्णय घेतला पाहिजे.

मात्र, अमेरिकेशी संबंध तोडणे हा या समस्येवरील उपाय नाही. संरक्षण, ऊर्जा, उच्च शिक्षण, संशोधन आणि व्यापार या क्षेत्रांत दोन्ही देशांचे हितसंबंध जोडलेले आहेत. त्यामुळे भावनिक प्रतिक्रियांपेक्षा मुत्सद्देगिरी, आर्थिक नियोजन आणि पर्यायी बाजारपेठांचा विस्तार यांना प्राधान्य द्यावे लागेल. युरोप, ब्रिटन, आखाती देश आणि आग्नेय आशियातील देशांशी व्यापार वाढविणे, देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी परदेशावरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे.

भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी जाण्याची गरज पडते, यामागे दर्जेदार शिक्षण, संशोधन आणि रोजगाराच्या संधींचाही प्रश्न आहे. देशातील विद्यापीठे आणि संशोधन संस्थांना जागतिक दर्जाचे बनविल्यास प्रतिभावंतांना भारतातच संधी मिळू शकतील. हीच खरी दीर्घकालीन स्वायत्तता ठरेल.

भारताने अमेरिकेशी मैत्री जरूर जपावी; मात्र ती मैत्री राष्ट्रीय हितांच्या किमतीवर नसावी. जागतिक महासत्ता होण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या भारताने प्रत्येक करारात स्वतःच्या हितांचे रक्षण करण्याची क्षमता दाखवली पाहिजे. भारताला अमेरिकेची शत्रुता नको, पण मैत्रीच्या नावाखाली दबावही नको. भागीदारी समानतेची असावी, दादागिरीची नव्हे!

## ।। अभंगवाणी ।।



जेथें घडे नारायणीं अंतराय ।
होत बाप माय वर्जावीं तीं ॥१॥

येर प्रिया पुत्र धना कोण लेखा ।
करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एसटीच्या ताफ्यात २०० व्होल्वो बस

## मार्च २०२७ पर्यंत १७० आसनी, ३० शयनयान बसचा समावेश

**महाईन्यूज । मुंबई**

**खासगी आराम बससेवांकडे वळणाऱ्या प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने आपल्या ताफ्यात २०० अत्याधुनिक वातानुकूलित व्होल्वो बस दाखल करण्याचे नियोजन केले आहे. या बस मार्च २०२७ पर्यंत टप्प्याटप्प्याने ताफ्यात दाखल होणार असून, त्यामध्ये १७० आसनी आणि ३० शयनयान बसचा समावेश आहे. शिवनेरी बससेवेच्या धर्तीवर या बस चालवण्यात येणार असल्याने लांब पल्ल्याच्या प्रवाशांना आरामदायी प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.**



एसटी महामंडळाकडून २०० बस पुरवण्याचे कंत्राट मिळाल्याचे व्होल्वो बस इंडियाने जाहीर केले. व्होल्वो बससाठी भारतातील हे आतापर्यंतचे सर्वात मोठे कंत्राट आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रीमियम आंतरशहरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. व्होल्वो ९६०० या मॉडेलच्या बस कंपनीच्या होस्कोटे येथील कारखान्यात तयार करण्यात येणार आहेत. या मॉडेलमध्ये आसनी आणि शयनयान असे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत.

एसटीच्या या नव्या बससेवेचे मार्ग, तिकीटदर आणि फेऱ्यांचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे. एसटीच्या ताफ्यात नव्या वातानुकूलित बस दाखल झाल्यामुळे खासगी आराम बससेवांशी स्पर्धा करण्याची महामंडळाची क्षमता वाढण्याची अपेक्षा आहे. मात्र, नव्या बसचे भाडे आणि सेवा सुरू होण्याची निश्चित तारीख जाहीर झाल्यानंतरच प्रवाशांना या सेवेचा प्रत्यक्ष लाभ कितपत मिळेल, हे स्पष्ट होईल.

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सध्या आव्हानात्मक आहे.

> “ या बस मार्च २०२७ पर्यंत एसटीच्या ताफ्यात दाखल होतील. लांब पल्ल्याच्या आणि अधिक प्रवासी वर्दळ असलेल्या मार्गांवर या बसची सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे प्रमुख शहरांदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक आरामदायी आणि दर्जेदार बससेवा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.
>
> **- प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री.**

महामंडळाच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसल्याने आर्थिक गणिते बिघडली आहेत. उन्हाळी हंगामातही उत्पन्नवाढीसाठी विशेष कामगिरी करता आलेली नाही. भाडेवाढीनंतरही आर्थिक स्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नसल्याने महामंडळाकडून उत्पन्नाचे नवे स्रोत शोधले जात आहेत. त्याचाच भाग म्हणून व्होल्वो बस चालवण्याचा पर्याय पुढे आला आहे. याद्वारे उच्च मध्यम आणि उच्च प्रवासी वर्ग एसटीकडे वळेल.

### नवीन व्होल्वो बसवर एसटीचा लोगो

शिवनेरीच्या भाडेतत्वावरील बस सेवेत खासगी कंत्राटी चालक असतो. तसेच या बसची देखभाल खासगी कंपनीद्वारे केली जाते. त्याचप्रमाणे एसटीच्या ब्रँडवरील प्रवाशांचा विश्वास आणि महामंडळाच्या पायाभूत सुविधांचा वापर करून नवीन व्होल्वो बसवर एसटीचा लोगो दिला जाईल. तसेच काही अत्यावश्यक बदल केले जातील.

---

# माहूर घाटात भीषण अपघात! टेम्पो खोल दरीत कोसळून यवतमाळच्या तिघांचा मृत्यू

**महाईन्यूज । नांदेड**

**श्रीक्षेत्र माहूर गडावर सुरू असलेल्या शारदीय नवरात्रोत्सवासाठी देशभरातून भाविकांची गर्दी होत असतानाच, रेणुका मातेचे दर्शन घेऊन यवतमाळकडे परतणाऱ्या भाविकांच्या टेम्पोला माहूर घाटात भीषण अपघात झाला. समोरून येणाऱ्या वाहनाचा प्रखर प्रकाश डोळ्यांवर पडल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि मॅक्सिमो जितो टेम्पो सुमारे १०० फूट खोल दरीत कोसळला. शुक्रवार (दि. १६) पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयामागील घाटातील पहिल्या धोकादायक वळणावर झालेल्या या अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर चालकासह अन्य दोघे किरकोळ जखमी झाले. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून घाटरस्त्यावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**



यवतमाळ येथील फर्निचरच्या दुकानात काम करणारे सहा कामगार एमएच २९ बीई ६८५९ क्रमांकाच्या मॅक्सिमो जितो टेम्पोने गुरुवार (दि. १५) रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास माहूरकडे दर्शनासाठी निघाले होते. रात्री १२ वाजेच्या सुमारास माहूर येथे पोहोचल्यानंतर त्यांनी श्री रेणुका मातेचे दर्शन घेतले. धार्मिक कार्यक्रम आटोपून गुरुवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास त्यांनी यवतमाळकडे परतीचा प्रवास सुरू केला. घाटातील पहिल्या धोकादायक वळणावर समोरून येणाऱ्या वाहनाचा प्रखर प्रकाश चालकाच्या डोळ्यांवर पडला. त्यातच समोरील वाहन विरुद्ध दिशेने आल्याने चालकाने टेम्पो बाजूला घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाहनावरील नियंत्रण सुटल्याने टेम्पो थेट खोल दरीत कोसळला. या वळणावर संरक्षक कठडा किंवा मजबूत संरक्षक भिंत नसल्याने अपघाताची तीव्रता वाढल्याचे सांगण्यात येत आहे.

या भीषण अपघातात राहुल ठाकरे आणि प्रीतम प्रधान यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या बाबाराव टेकाम यांचा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. दत्तू मेश्राम, प्रतीक आडके आणि यशवंत पाटील यांना दुखापत झाली. त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. बिपिन बाभळे यांनी प्राथमिक उपचार केले. दरीतील दगडांवर आदळून तसेच अंगावर दगड आणि टेम्पो पडल्याने काहींना गंभीर दुखापत झाल्याची माहिती आहे.

अपघाताची माहिती भाविकांनी ११२ क्रमांकावर दिल्यानंतर गस्तीवर असलेले पोलीस निरीक्षक देविदास चोपडे आणि पोलीस कर्मचारी पवन राऊत यांना घटनेची माहिती मिळाली. त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने जखमींना दरीतून बाहेर काढून ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरीत पडलेले मृतदेह बाहेर काढणे आव्हानात्मक ठरले.

पोलीस निरीक्षक चोपडे यांनी पत्रकार इलियास बावाणी आणि पत्रकार गोपाल चव्हाण यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून ग्रामीण रुग्णालयात पोहोचविले. शारदा कन्स्ट्रक्शनचे सुपरवायझर श्रीनिवास यांनी तातडीने क्रेन उपलब्ध करून दिल्याने दरीत कोसळलेला टेम्पो बाहेर काढण्यात आला. ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असताना डॉ. बिपिन बाभळे यांनी बाबाराव टेकाम यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. रुग्णालयातील वैद्यकीय व परिचारिका कर्मचारी तसेच १०८ रुग्णवाहिकेच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने सेवा देत जखमींवर उपचार केले. मृतदेहांचे शवविच्छेदनही करण्यात आले.

या मदतकार्यात एस. बी. बोथिंगे, दत्ता पालटवाड, एस. कुंठेकर, आर. श्रीमंगले, पी. आर. जुडे, जी. आर. भोपाळे, अमृता कऱ्हाळे आणि गणेश धुळगंडे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, पोलीस हवालदार सत्यमल मडावी, पोलीस कर्मचारी संघरत्न सोनसळे व पवन राऊत तसेच होमगार्ड एस. पी. भगत आणि मुरकुटे पुढील तपास करीत आहेत.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माहूर गडावर भाविकांची मोठी वर्दळ असताना घडलेल्या या दुर्घटनेने घाटरस्त्यावरील सुरक्षित प्रवासाचा प्रश्न गंभीर बनला आहे. घाटातील धोकादायक वळणांवर संरक्षक कठडे, मजबूत भिंती, दिशादर्शक फलक आणि रात्रीच्या वेळी वाहनचालकांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा यासाठी आवश्यक उपाययोजना आहेत की नाहीत, याची संबंधित विभागाने तातडीने पाहणी करणे गरजेचे आहे. नवरात्रोत्सवासाठी हजारो भाविक माहूरला येत असल्याने संभाव्य अपघात टाळण्यासाठी घाटातील धोकादायक ठिकाणांची ओळख पटवून तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# CJP च्या आंदोलनामागे एलॉन मस्क?

## भाजपाचे नेते बृजभूषण सिंहांच्या आरोपाने खळबळ; म्हणाले, "एक उद्योगपती.."

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि एसआयआर प्रक्रियेच्या विरोधात देशभरात आंदोलन सुरू आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधक करत आहेत. दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनामुळे मागील काही दिवसांपासून दिल्लीत तणावाचं वातावरण निर्माण झालेलं आहे.**





कॉक्रोच जनता पार्टीच्या दिल्लीतील आंदोलनाबाबत बोलताना भाजपाचे नेते बृजभूषण शरण सिंह यांनी एक गंभीर आरोप केला आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या दिल्लीतील आंदोलनामागे उद्योगपती एलॉन मस्क यांचा हात असल्याचा आरोप बृजभूषण शरण सिंह यांनी आज (१६ ऑक्टोबर) माध्यमांशी बोलताना केला आहे. 'कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन हे एलॉन मस्क यांच्या सांगण्यावरून सुरू आहे', असा दावा बृजभूषण शरण सिंह यांनी केला आहे.

कॉक्रोच जनता पार्टीच्या दिल्लीतील आजच्या आंदोलनाबाबत बोलताना बृजभूषण शरण सिंह म्हणाले की, "ही संपूर्ण चळवळ त्यांच्या (एलॉन मस्क यांच्या) सांगण्यावरून घडवून आणली जात आहे. हे आपल्या राष्ट्राविरुद्धचं एक मोठं षड्यंत्र आहे. आपल्या देशाची तुलना बांगलादेश आणि पाकिस्तानशी केली जात आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाला धमकावण्याच्या उद्देशाने मोर्चा काढला जात आहे. असं याआधी कधीही घडलेलं नाही. हे विदेशी लोक जे आपल्या देशात व्यवसाय करू इच्छित आहेत तेही स्वतःच्या अटींवर, तेच लोक (एलॉन मस्क) या चळवळीला (सीजेपीच्या) खतपाणी घालत आहेत", असा गंभीर आरोप बृजभूषण शरण सिंह यांनी केला आहे.

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाबाबत बोलताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी टीका करत गंभीर आरोप केले आहेत. राजनाथ सिंह यांनी म्हटलं की, "गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत जे काही घडत आहे किंवा दिल्लीत अलीकडे घडलेल्या घटनांमधून अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामध्ये असं दिसतंय की, काँग्रेस आणि त्यांचे काही राजकीय मित्रपक्ष हे थेट किंवा आपापल्या संलग्न संघटनांच्या माध्यमातून तरुणांची ऊर्जा राष्ट्रनिर्माणाकडे वळवण्याऐवजी राजकीय संघर्ष आणि अराजकता निर्माण करण्याचं साधन बनवण्याचा प्रयत्न करत आहेत", अशी टीका राजनाथ सिंह यांनी केली.

"बांगलादेशातील घटनांच्या धर्तीवर काही लोक सत्तापालट घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत. एका पत्रकार परिषदेत एका व्यक्तीने हे उघडपणे म्हटलंही आहे. त्यामुळे यावरून हे स्पष्ट होतं आहे की त्यांचा एकमेव अजेंडा लोकशाही संस्था उद्ध्वस्त करणं आणि देशाला आगीत लोटणं हाच आहे. सत्तापालट या सारख्या शब्दांचा वापर हेच दर्शवत आहे की त्यांचा संघर्ष निवडणुकीच्या सुधारणांबाबत किंवा एसआयआरबाबत किंवा ज्ञानेश कुमारांच्या विरोधात नाही. त्यांची ही लढाई देशातील तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी देखील नाही. उलट त्यांची ही लढाई देशात अराजकता निर्माण करून सत्ता हस्तगत करण्यासाठी हा एक कट आहे", असा गंभीर आरोप राजनाथ सिंह यांनी आज माध्यमांशी बोलताना केला आहे.



## सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यात महिलेवरही कारवाई शक्य; उच्च न्यायालयाचा निर्णय

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यात महिलेवरही कारवाई होऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. सामूहिक बलात्कार करण्याच्या समान हेतूने एखादी व्यक्ती गटाचा भाग म्हणून सहभागी झाली असेल, तर तिचे लिंग काहीही असले तरी तिला या गुन्ह्यासाठी जबाबदार धरता येऊ शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती ए. जे. भंभानी यांनी १५ ऑक्टोबर रोजी हा निर्णय दिला.**

भारतीय न्याय संहिता कलम ७० आणि भारतीय दंड संहिता कलम ३७६D या दोन्ही तरतुदी सामूहिक बलात्काराशी संबंधित आहेत. या कलमांमध्ये 'गट तयार करणाऱ्या एक किंवा अधिक व्यक्ती' आणि 'समान हेतूने कृती करणाऱ्या व्यक्ती' असा उल्लेख आहे. या तरतुदींमधील 'व्यक्ती' हा शब्द केवळ पुरुषांसाठी मर्यादित मानण्याचे कोणतेही कारण नाही, असे न्यायालयाने नमूद केले. एखाद्या व्यक्तीने स्वतः बलात्कार केला नसला, तरी ती सामूहिक गुन्ह्यात समान हेतूने सहभागी असेल, तर कायद्यानुसार तिला त्या गुन्ह्यासाठी जबाबदार धरता येऊ शकते. मात्र, एखादी महिला एकटीच असेल आणि तिच्याबरोबर सामूहिक गुन्ह्यात सहभागी होणारा गट नसेल, तर तिला सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यात आरोपी करता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणातील आरोपी महिला ही कथित पीडित अल्पवयीन मुलीची आई आहे. आरोपानुसार, सहआरोपीबरोबर शारीरिक संबंध ठेवण्यास नकार दिल्यास मुलीला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. तसेच, महिलेने मुलीला सहआरोपीबरोबर शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले आणि कथित अत्याचार सुरू असताना ती खोलीत उपस्थित होती, असे मुलीने आपल्या जबाबात म्हटल्याचे वृत्त आहे. या प्रकरणात संबंधित महिला आणि सहआरोपीने भारतीय न्याय संहिता तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा अंतर्गत आरोप निश्चित करण्याच्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून आरोप निश्चित करण्याचा आदेश कायम ठेवला.



महिलेला सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यात आरोपी करता येत नाही, असा युक्तिवाद उच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. न्यायप्रक्रियेत कायद्यातील 'व्यक्ती' या शब्दाचा लिंगनिरपेक्ष अर्थ लावत न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. मात्र, याच वेळी बलात्काराच्या कायदेशीर व्याख्येतील 'पुरुष' या शब्दाचा लिंगनिरपेक्ष अर्थ लावता येईल का, यावर भविष्यासाठी एक व्यापक कायदेशीर प्रश्न न्यायालयाने खुला ठेवला आहे.

या निर्णयामुळे सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यात समान हेतूने सहभागी असलेल्या व्यक्तीची जबाबदारी ठरवताना केवळ तिच्या लिंगाच्या आधारावर सूट देता येणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.

### बलात्काराच्या व्याख्येतील बदलाचाही उल्लेख

न्यायालयाने बलात्काराच्या कायदेशीर व्याख्येतील बदलांचा संदर्भ दिला. २०१३ पूर्वी भारतीय दंड संहितेतील कलम ३७५ अंतर्गत बलात्काराची व्याख्या प्रामुख्याने पुरुषाकडून स्त्रीवर होणाऱ्या लिंग-योनी प्रवेशापुरती मर्यादित होती. मात्र, २०१३ मधील दुरुस्तीनंतर या व्याख्येचा विस्तार करण्यात आला. सध्याच्या तरतुदींनुसार, योनी मार्गाव्यतिरिक्त शरीराचा अन्य भाग किंवा वस्तूचा प्रवेश, शरीराच्या विशिष्ट भागांशी संबंधित कृती आणि तोंडाचा योनी, गुदद्वार किंवा मूत्रमार्गाशी संपर्क यांसारख्या सर्व कृतींचाही कायद्यानुसार बलात्काराच्या व्याख्येत समावेश होतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# रजनीकांतचा 'जेलर 2' बॉक्स ऑफिसवर सुपरहिट!

सुपरस्टार रजनीकांत यांच्या २०२३ मधील 'जेलर' या ब्लॉकबस्टर सिनेमाचा सिक्वेल 'जेलर २' ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी बंपर कमाई केली आहे. या सिनेमाला भारतात पहिल्याच दिवशी तब्बल ७०.२५ कोटी रुपयाची ओपनिंग मिळाली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, 'जेलर २'ने भारतात पहिल्या दिवशी एकूण ७०.२५ कोटी रुपयांची कमाई केली. याउलट, रजनीकांत यांच्याच 'कुली' सिनेमाने पहिल्या दिवशी ६५ कोटी रुपयांचा गल्ला जमवल्याचे सांगितले जाते. त्यामुळे सुरुवातीच्या कमाईच्या आकड्यांनुसार 'जेलर २'ने 'कुली'ला मागे टाकल्याचे चित्र आहे.

ट्रेड ट्रॅकर सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, 'जेलर २'ने पहिल्या दिवशी भारतात १६,५९९ शोजमधून ५९.७० कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली. भारतातील एकूण कमाई ७०.२५ कोटी रुपये असल्याचे वृत्त आहे. परदेशातील कमाई




५५ कोटी रुपये गृहीत धरल्यास सिनेमाचे जगभरातील एकूण कलेक्शन १२५.२५ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे सांगितले जात आहे. पहिल्या दिवसाच्या कमाईचे आकडे पाहता विकेंडमध्ये हा सिनेमा आणखी मोठी कमाई करेल असे सांगितले जात आहे.

'जेलर २'चे दिग्दर्शन नेल्सन दिलीपकुमार यांनी केले आहे. सन पिक्चर्सच्या बॅनरखाली कलानिधी मारन यांनी या सिनेमाची निर्मिती केली आहे. अनिरुद्ध रविचंद्रन यांनी सिनेमाला संगीत दिले असून, विजय कार्तिक कन्नन यांनी छायांकनाची जबाबदारी सांभाळली आहे.

या सिनेमात रजनीकांत यांच्यासोबत रम्या कृष्णन, एस. जे. सूर्या, मोहनलाल आणि सूरज वेंजारामूडू यांसारखे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. याशिवाय, जॅकी श्रॉफ, विद्या बालन, मिथुन चक्रवर्ती आणि हृतिक रोशन यांच्या कॅमिओ भूमिका उत्तम आहेत. सिनेमात रजनीकांत यांनी साकारलेली मुथुवेल पांडियन अर्थात 'टायगर' ही व्यक्तिरेखा पुन्हा एकदा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे.



## राधिकाचा शाही अंदाज!

उद्योगपती मुकेश अंबानी यांची धाकटी सून आणि अनंत अंबानी यांची पत्नी राधिका मर्चंट आपल्या फॅशन स्टाइलमुळे नेहमीच चर्चेत असते. पारंपरिक पोशाख असो किंवा आधुनिक अंदाजातील फॅशन, राधिका प्रत्येक वेळी आपल्या लूकने लक्ष वेधून घेते. यावेळीही तिच्या एका खास लूकची सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. 'स्वदेश' या ब्रँडच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त राधिकाने परिधान केलेल्या राजेशाही पोशाखाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. 'स्वदेश' या ब्रँडच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त राधिका मर्चंटने पारंपरिक आणि आधुनिक फॅशनचा सुंदर मेळ साधणारा पोशाख निवडला होता.

तिच्या या लूकमध्ये भारतीय संस्कृतीची झलक आणि आधुनिक फॅशनची छाप पाहायला मिळते. सोनेरी रंगाच्या छटा, सुंदर भरतकाम आणि आकर्षक डिझाइन यांमुळे तिचा पोशाख उठून दिसत होता. प्रसिद्ध बॉलीवूड स्टायलिस्ट रिया कपूरने राधिकाच्या या खास लूकचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोंमधून तिच्या पोशाखाची कलाकुसर, दागिन्यांची निवड आणि संपूर्ण लूकची आकर्षक मांडणी पाहायला मिळते.



## वयाच्या 19 व्या वर्षी कास्टिंग काऊचचा अनुभव!

चित्रपटसृष्टी आणि छोट्या पडद्यावरील कलाकारांना अनेकदा कास्टिंग काऊचसारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक कलाकारांनी याबाबतचे कटू अनुभव सार्वजनिकपणे सांगितले आहेत. 'तारक मेहता का उल्टा चश्मा' या लोकप्रिय मालिकेमुळे ओळख मिळवलेली अभिनेत्री आराधना शर्मा हिनेही कास्टिंग काऊचचा धक्कादायक अनुभव शेअर केला होता. आराधनाने सांगितल्यानुसार, ती अवघ्या १९ वर्षांची असताना तिच्यासोबत हा प्रकार घडला. स्क्रिप्ट वाचण्याच्या बहाण्याने एका कास्टिंग डायरेक्टरने तिच्याशी अयोग्य वर्तन केल्याचा आरोप तिने केला होता. या घटनेचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावरही मोठा परिणाम झाला आणि पुरुषांवरील तिचा विश्वास कमी झाल्याचे तिने सांगितले होते. २०२१ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत आराधना शर्माने तिच्यासोबत घडलेल्या या घटनेबद्दल भाष्य केले होते. ही घटना २०१६-१७ च्या सुमारास घडल्याचे तिने सांगितले. त्या वेळी ती पुण्यात शिक्षण घेत होती आणि मॉडेलिंगही करत होती. तिची एका कास्टिंग करणाऱ्या व्यक्तीशी ओळख होती. एका भूमिकेसाठी कास्टिंग सुरू असल्याचे सांगून तिला रांची येथे बोलावण्यात आले होते. तिथे एका खोलीत स्क्रिप्ट वाचत असताना संबंधित व्यक्तीने तिला अयोग्य पद्धतीने स्पर्श करण्याचा प्रयत्न केल्याचे आराधनाने सांगितले. सुरुवातीला नेमके काय घडत आहे हे तिला समजले नाही. मात्र, परिस्थिती लक्षात येताच तिने त्या व्यक्तीला दूर ढकलले आणि दरवाजा उघडून तिथून पळ काढला. या घटनेनंतर अनेक दिवस ती कोणालाही याबद्दल सांगू शकली नव्हती. संबंधित स्क्रिप्टमध्ये प्रेमप्रसंगाचा सीन होता. मात्र, स्क्रिप्ट वाचण्याच्या निमित्ताने घडलेल्या या प्रकारामुळे तिला मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे तिने मुलाखतीत सांगितले होते.

# हे खेळ भावनेच्या विरोधात

## वेस्ट इंडिजचा गोलंदाज शामार जोसेफने फलंदाजांना लक्ष्य करत केला 'बाउन्सर्स'चा मारा

**महाईन्यूज । हाँगकाँग**

**भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील चौथ्या टी-२० सामन्यादरम्यान वेस्ट इंडिज संघाच्या क्रीडावृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. प्रथम फलंदाजी करताना, कर्णधार शाई होपच्या शतकाच्या जोरावर वेस्ट इंडिजने भारतासमोर २४८ धावांचे आव्हान ठेवले होते. प्रत्युत्तरात, भारतीय संघाने केवळ २२३ धावांपर्यंत मजल मारली.**




शामार जोसेफने टाकलेल्या २० व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर अर्शदीप सिंगने चौकार मारला. तिसऱ्या चेंडूवर जोसेफने एक वेगवान 'बाउन्सर' टाकला, जो अर्शदीप सिंगच्या डाव्या हाताला लागला. चेंडूचा वेग इतका जास्त होता की, काही काळासाठी खेळ थांबवावा लागला. आपल्या खेळाडूची प्रकृती पाहून भारतीय कर्णधाराने अर्शदीप सिंगला परत बोलावण्याचा विचार केला होता, परंतु फलंदाजाने खेळ सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. गावस्कर यांनी प्रश्न उपस्थित केला की, स्टंप्स स्पष्ट दिसत होते, तेव्हा जोसेफने अर्शदीप सिंगला लक्ष्य करणे का निवडले? दुसऱ्या गोलंदाजाच्या दिशेने अशा प्रकारची आक्रमकता दाखवणे विशेषतः अशा सामन्यात ज्याचा मालिकेच्या निकालावर कोणताही परिणाम होणार नव्हता, हे खेळ भावनेच्या विरोधात आहे." भारताच्या गोलंदाजीतील कमकुवतपणा उघड झाल्यानंतर, फलंदाजी फळीही अपयशी ठरली. वेस्ट इंडिजविरुद्ध भारताला २४ धावांनी पराभव पत्करावा लागला. या निकालामुळे पाच सामन्यांची टी-२० मालिका २-२ अशी बरोबरीत आली आहे. कर्णधार शाई होपच्या शतकी खेळीनंतर (१०२* धावा), कीमो पॉलने ४१ धावांत ५ बळी मिळवले. यामुळे २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणारा भारतीय संघ १९.३ षटकांत २२३ धावांत सर्वबाद झाला. भारतासाठी संजू सॅमसनने चमकदार कामगिरी करत अवघ्या २३ चेंडूंत ५६ धावा केल्या, यामध्ये सहा चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. पॉलव्यतिरिक्त, गुडाकेश मोतीने प्रभावी गोलंदाजी करत दोन षटकांत १३ धावा देऊन दोन बळी घेतले, तर शामार स्प्रिंगर आणि रोमारियो शेफर्ड यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला. मालिकेतील शेवटचा सामना शनिवारी बेंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाईल.

### पुन्हा एकदा 'बाउन्सर'च टाकला

अर्शदीप सिंग पुढचा चेंडू खेळण्यासाठी सज्ज झाला, पण शामार जोसेफने पुन्हा एकदा 'बाउन्सर' टाकला. अर्शदीपने पुढे येऊन मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, परंतु चेंडू त्याच्या जवळून निघून गेला. चेंडू फलंदाजाला लागला नाही आणि पंचांनी तो 'वाईड' (WIDE) घोषित केल्यामुळे भारताला चार धावा मिळाल्या. यावेळी समालोचन करत असलेले सुनील गावस्कर म्हणाले की, "तो फलंदाजाला लक्ष्य करत आहे. जेव्हा स्टंप्स समोर स्पष्ट दिसत आहेत, तेव्हा फलंदाजावर हल्ला करण्याचे कारण काय?

# टीम इंडियाने वैभव सूर्यवंशीला वाया घालवलं; संजू बेभरवशाचा!

**महाईन्यूज । मुंबई**

**वैभव सूर्यवंशीला वेस्ट इंडीजविरूद्धच्या टी २० मालिकेत आतापर्यंत एकाही सामन्यात खेळण्याची संधी मिळालेली नाही. प्रत्येक सामन्यापूर्वी आता वैभवचा समावेश होणार अशी चर्चा सुरूअसते. मात्र ज्यावेळी प्लेईंग ११ जाहीर होते त्यावेळी वैभवसकट सर्वांची निराशा होते. चौथ्या टी २० सामन्यावेळी देखील तसेच झाले आहे. कर्णधार श्रेयस अय्यर आणि प्रशिक्षक गौतम गंभीरने प्लेईंग ११ मध्ये वैभव ऐवजी संजू सॅमसनला संधी दिली.**



### वैभवला पूर्णपणे वाया घालवलं

वैभवला इंग्लंड दौऱ्यावर पदार्पण करण्याची संधी मिळाली होती. मात्र त्याला दोन सामन्यानंतर बेंचवर बसवण्यात आलं. झिम्बाब्वे दौऱ्यावर त्याला पूर्ण मालिका खेळण्याची संधी मिळाली होती. तिथं तो प्लेअर ऑफ द सीरिज झाला होता. मात्र अफगाणिस्तानविरूद्धच्या मालिकेत पुन्हा त्याला बेंचवर बसवण्यात आलं. आता विंडीजसोबत ५ पैकी ४ सामन्यात तो बेंचवरच होता. यावरून के श्रीकांत यांनी आपल्या युट्यूब व्हिडिओत सांगितलं की, 'टीम इंडियाने सूर्यवंशीला पूर्णपणे वाया घालवलं आहे. त्याला वेस्ट इंडीज विरूद्धच्या मालिकेत ३ सामने खेळण्याची संधी देता आली असती. अभिषेक शर्मा दीर्घ काळापासून खेळत आहे. त्याला आराम देता आला असता अन् सूर्यवंशीला सॅमसनसोबत सलामीला पाठवता आलं असतं.'

भारताने चौथा टी २० सामना गमावला. त्याचबरोबर मालिका खिशात घालण्याची संधी देखील दवडली.त्यानंतर आता भारताचे माजी कर्णधार आणि माजी निवडसमिती अध्यक्ष के श्रीकांत यांनी अत्यंत कडक शब्दात टीका केली आहे. त्यांनी टीम इंडियाने वैभव सूर्यवंशीला वाया घालवलं असे वक्तव्य केलं. श्रीकांत पुढे म्हणाले की, 'सॅमसन कायम वर खाली होत राहिला आहे. त्याच्या खेळीतील सातत्याबाबत कायम साशंकता राहिली आहे. तो अचानक वर्ल्डकपसारखा चमत्कार करेल आणि पुन्हा फेल होईल. अभिषेक शर्मा सारखी कामगिरी कोणी करत नाहीये. पुन्हा सॅमसन पुढच्या सामन्यात धावा करेल.'

चौथ्या टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताला २४ धावांनी पराभव सहन करावा लागला. विंडीजचा कर्मधार शे होपने नाबाद १०२ धावांची धडाकेबाज खेळी केली. विंडीजने २४८ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर किमो पॉलने ४१ धावात ५ विकेट घेऊन भारताला २२३ धावातच रोखले. भारताकडून संजू सॅमसनने २३ चेंडूत ५६ धावांची खेळी केली. तर तिलक वर्मनि ४३ आणि नितीश कुमार रेड्डीने ४१ धावा करत झुंज दिली. मात्र इतर फलंदाजांनी हाराकिरी केल्याने भारताला २४८ धावांचे टार्गेट गाठता आले नाही.

आता मालिकेतील शेवटचा सामना हा शनिवारी १७ ऑक्टोबर रोजी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या सामन्यात तरी वैभव सूर्यवंशीला खेळण्याची संधी मिळते का ते पाहणे उत्सुकतेचं ठरणार आहे.

भारताने चौथ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात वेस्ट इंडिजकडून २४ धावांनी पराभव स्वीकारला आणि मालिका जिंकण्याची संधी गमावली. या पराभवानंतर भारताचे माजी कर्णधार आणि माजी निवडसमिती अध्यक्ष के. श्रीकांत यांनी टीम इंडियावर कडक शब्दांत टीका केली. त्यांनी वैभव सूर्यवंशीला संधी न देण्यावरून भारतीय संघ व्यवस्थापनाला लक्ष्य करत, भारताने त्याची प्रतिभा वाया घालवल्याचे म्हटले. संजू सॅमसनच्या कामगिरीतील सातत्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना, तो कधी चांगली खेळी करतो, तर कधी अपयशी ठरतो, अशी टिप्पणीही त्यांनी केली. चौथ्या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होपने नाबाद १०२ धावांची खेळी करत संघाला २४८ धावांपर्यंत पोहोचवले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।
दि. 17 ऑक्टोबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# देहूतील कचरा डेपोचा प्रश्न पेटला

## सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक आणि कंपाऊंडच्या मागण्या प्रलंबित; अनिरुद्ध काळोखे

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**देहू येथील कचरा डेपोमध्ये बाहेरगावचा कचरा आणून रात्रीच्या अंधारात टाकण्यासह तो पेटवून दिला जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. १५ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास कचरा टाकून जाळणाऱ्या एका इसमाला भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी पकडून नगरपंचायत कर्मचारी आणि देहूरोड पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेमुळे परिसरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे यांनी दिला आहे.**

देहू कचरा डेपोतील कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन होत नसल्याने परिसरात दुर्गंधी आणि धुराचा त्रास होत असल्याच्या तक्रारी आहेत. डेपोमध्ये बाहेरगावचा कचरा आणून टाकला जात असल्याचा तसेच रात्रीच्या वेळी तो पेटवून दिला जात असल्याचा आरोप भाजप युवा मोर्चाने केला आहे. कचरा जाळल्यामुळे निर्माण होणाऱ्या धुराचा स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत असून, या समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करण्यात येत आहे.

देहू कचरा डेपोतील अनियंत्रित कचरा टाकणे आणि जाळण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी भाजप युवा मोर्चाची मागणी आहे. सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक, संरक्षक कंपाऊंड आणि योग्य कचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे आता देहू नगरपंचायत प्रशासन या प्रश्नावर कोणती भूमिका घेते आणि कायमस्वरूपी उपाययोजना कधी राबवते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



### निवेदनानंतरही प्रशासनाची ठोस कार्यवाही नाही

या प्रश्नावर भाजप युवा मोर्चाच्या वतीने ७ ऑक्टोबर २०२६ रोजी देहू नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले होते. कचरा डेपो परिसरात दहा दिवसांच्या आत सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमावा, संपूर्ण परिसराला संरक्षक कंपाऊंड घालावे आणि मुख्य रस्त्यापासून दूर अंतरावर कचरा टाकण्याची व्यवस्था करावी, अशा प्रमुख मागण्या या निवेदनातून करण्यात आल्या होत्या. मात्र, या मागण्यांवर अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप युवा मोर्चाने केला आहे.

> “देहूतील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सहन केला जाणार नाही. बाहेरगावचा कचरा टाकून तो जाळण्याच्या प्रकाराची प्रशासनाने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक, कंपाऊंड आणि शास्त्रोक्त कचरा व्यवस्थापनाची कायमस्वरूपी व्यवस्था करावी. अन्यथा, भाजप युवा मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल.”
>
> - अनिरुद्ध काळोखे, अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, देहू

### अग्निशामक दलाकडून आग विझवली

दरम्यान, १५ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास बाहेरगावची कचरा गाडी डेपोवर कचरा टाकत असल्याची माहिती भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना मिळाली. त्यानंतर कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली असता, कचरा टाकून तो पेटवला जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कार्यकर्त्यांनी तत्परता दाखवत संबंधित इसमाला पकडले आणि देहू नगरपंचायतीचे कर्मचारी तसेच देहूरोड पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना घटनास्थळी बोलावले. त्यानंतर संबंधित इसमाला त्यांच्या ताब्यात देण्यात आले. कचरा जळत असल्याने अग्निशामक दलाच्या गाडीला पाचारण करून आग विझविण्यात आली. या कारवाईवेळी भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे, उपाध्यक्ष सचिन मराठे, दुर्गेश भालेराव तसेच देहू नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

---

# राजमाता कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या डुडुळगाव येथील शैक्षणिक संकुलातील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवा पिढीचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या ज्ञानात भर पडावी आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल कुंभार उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभा मतदारसंघाचे प्रथम आमदार श्री. विलास लांडे, संस्थेचे सचिव मा. श्री. सुधीर मुंगसे, खजिनदार श्री. अजित गव्हाणे विश्वस्त मा. श्री. विक्रांतजी लांडे आणि विश्वस्त मा.श्री.सुमित मुंगसे यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.



यावेळी डॉ. जीवन धुमाळ, डॉ. निलेश जाधव, श्री. संजय तोगम, सौ. सपना शेंगाळ, प्रा. ऋतुजा तावरे, प्रा. अचल चिमकर, प्रा. मेघा जाधव, प्रा.कल्याणी थोरात, प्रा. प्रतिमा पोळके आणि प्रा. सविता दुबे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचन संस्कृती रुजविणे आणि ज्ञानसमृद्ध समाज घडविणे हा संदेश देण्यात आला.

# ग्रंथांचा आधार घेऊन कौशल्य सिद्ध करा

## ग्रंथ विश्वासार्हता देतात; एसबीपीआयएम येथे वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**सध्याचा काळ हा कौशल्य प्राप्त असणाऱ्या व्यक्तींचा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लेखन, वाचन, संवाद कौशल्य विकसित करून गुणवत्ता वाढवली पाहिजे. एमबीए आणि पीएचडी सारखे उच्च शिक्षण घेत असताना तुमची क्षमता सिद्ध करावी लागते.**




यासाठी पूर्णता एआय किंवा गुगल वर अवलंबून राहू नये, तर ग्रंथालयात जाऊन संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन आपले कौशल्य सिद्ध करा, ग्रंथ तुम्हाला विश्वासार्हता देतात त्यामुळे शब्दसंग्रह समृद्ध होतो. संवाद साधताना तांत्रिक भाषा किंवा पारिभाषिक शब्दांचा वापर करून आत्मविश्वासाने सादरीकरण करता येते. नेहमी स्वतः मूळ लेखन करावे. संदर्भासाठी एआय आणि ॲप्स चा वापर सहाय्यक म्हणून करता येईल, परंतु त्यातील मजकूर कॉपी पेस्ट करू नये. कारण ते वाङ्मयचौर्य आहे असे मार्गदर्शन आयएमसीसी च्या प्रा. डॉ. मीनल ओक यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे वाचन प्रेरणा दिवस निमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानात डॉ. ओक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी माजी राष्ट्रपती ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात ग्रंथ वाचन करीत त्यांना अभिवादन केले. यावेळी एसबीपीआयएम च्या संचालक, प्राचार्य डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक प्रमुख डॉ. रूपाली कुदरे, आर अँड डी प्रमुख डॉ. भूषण परदेशी, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. स्वप्नील सोनकांबळे, डॉ. अमरीश पद्मा आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांना वाचक प्रेरणा दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. ग्रंथपाल स्वाती सातपुते, सहाय्यक ग्रंथपाल अनघा कुलकर्णी यांनी आयोजनात सहभाग घेतला.

सूत्रसंचालन विद्यार्थी आर्या सरदेशपांडे, ओम माळी यांनी केले.

# The Body Is the First Classroom

**Before a child learns to write a sentence, the child learns to move. A child reaches for a toy, crawls, stands, falls, gets up and tries again. In these simple actions, the first lessons of life are already taking place. Balance, coordination, curiosity, confidence and persistence are discovered through experience before they are explained through words. This is why the body can truly be called a child's first classroom.**

Yet, somewhere between examinations, homework, tuition classes and increasing screen time, we have begun to separate physical development from education. We speak about developing a child's mind, but sometimes forget that the mind does not exist separately from the body. Education cannot be complete if the body is always expected to remain still.

Learning is not limited to sitting at a desk. The brain is constantly receiving information through movement and experience. In a simple football game, a child observes the ball, understands another player's movement, makes a decision and reacts within seconds. Kho-kho develops awareness, speed and quick decision-making, while an obstacle course challenges balance, coordination and confidence. The playground is full of small decisions, and every decision becomes an opportunity to learn.

Physical activity also supports attention, self-control and concentration. When children move regularly, they are not only developing physical abilities; they are giving their minds opportunities to practise focus, coordination and decision-making. Exercise cannot replace academic education, but physical development and academic learning should not be treated as separate worlds. A healthy education must educate the whole child.

There are lessons that can be explained, and there are lessons that must be experienced. A textbook can define teamwork, but a game makes a child practise it. A teacher can explain discipline, but regular training makes a child experience it. A lesson can describe failure, but losing a game makes a child face it.

A child who loses a match and still shakes hands with an opponent learns respect. A child who encourages a teammate learns empathy. A child who controls anger after an unfair decision learns emotional regulation. A child who continues practising after repeated failure learns resilience. These lessons remain valuable long after the game is forgotten. The scoreboard records who won, but it cannot record how much a child grew while playing.

Personality is developed through repeated experiences. For some children, the playground becomes the first place where they discover confidence. A quiet child may find leadership while organising a team. A child afraid of failure may slowly learn to try again. Another may discover an ability that was never visible inside the classroom.

Physical education also teaches children that everyone has different strengths. One child may run faster, another may have better coordination, someone may understand the game better, while another may naturally



motivate the team. The purpose of physical education should not be to make every child the same. It should help every child discover what they can do and encourage them to improve.

Childhood today is changing rapidly. Screens provide games, entertainment and communication without requiring children to leave their chairs. Technology itself is not the enemy; it has brought many benefits. The concern begins when convenience replaces movement.

When outdoor play becomes less frequent, children lose more than physical activity. The playground has traditionally been a place where children made friends, negotiated rules, solved disagreements, experienced failure and learned how to interact with others....

By
Omkar Dhumal
PE Teacher
Priyadarshani School,Moshi

# The Light Beyond the Screen

What is the first thing we do when someone far away wishes us "Happy Diwali"?
We reach for our phone.
A message arrives, a video call connects a family, a photo travels across cities, and within seconds, someone miles away becomes a part of our celebration.

This is the world Information Technology has created for us.

As an IT educator, I witness this change every day in my classroom. I have seen students who were once hesitant to touch a computer slowly become confident with technology. I have watched a simple piece of code bring excitement to a student's face, and a new digital skill make a student believe, "Yes, I can do this."

These moments have taught me that technology is not merely about machines. It is about possibilities.

The internet has made learning accessible, digital payments have changed the way we shop, e-commerce has taken markets into our homes, and digital platforms have given even small businesses a larger voice. Databases quietly manage information, e-governance makes services easier, and now Artificial Intelligence is opening doors we once imagined only in stories.

As a teacher, I find this transformation exciting.

But I also find myself asking my students an important question:

"Technology can give you an answer—but can it teach you what is right?"

A student can search for information in seconds. AI can write an answer. The internet can show thousands of opinions. But education, I believe, is not about collecting answers. It is about learning to question, understand and think independently.

That is why, in my classroom, I try to teach more than computers and applications. I want my students to understand that their digital choices have consequences. Protecting personal data, recognising misinformation, being careful with links and passwords, and using AI responsibly are not just technical skills—they are life skills.

Because behind every password is a person. Behind every database entry is a story. Behind every screen is someone who still needs understanding, kindness and connection.



And sometimes, technology makes me think about something even more important.

We can connect with someone thousands of kilometres away, yet ignore the person sitting beside us.

We can photograph every Diwali moment, yet forget to enjoy it.

We can have all the information in the world, yet still forget to listen.

Perhaps that is why Diwali feels so meaningful in today's digital world.

We may make digital payments while buying faral, send greetings through WhatsApp, take photographs on our smartphones and connect with relatives through video calls. Yet when the evening comes, what truly makes Diwali special is still the same—family sitting together, laughter filling the room, sweets being shared and a small diya glowing quietly in the corner.




**Technology changes.**

But the things that make us human do not.

As an educator, perhaps this is the greatest lesson I want my students to carry into the future: learn technology, explore it, create with it—but never allow it to replace your curiosity, your values or your humanity.

Screens may brighten our days, technology may simplify our lives, and Artificial Intelligence may shape our future. But the warmth of a family, the smile of a loved one and the kindness we share can never be replaced by a machine.

May this Diwali remind us that while technology makes life easier, humanity is what makes life worth living.

**Happy Diwali**

**Ms. Jagruti Patil**
Assistant Professor,
Social Media Coordinator
Dr.D.Y.Patil ACS Junior College, Akurdi